**दिनांक ०१/०८/२०२३**

# प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक श्री. युसूफ खान गुलाब खान, वय 45 वर्षे, पद-तलाठी, सजा- पिंप्री, तालुका सिल्लोड जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रक्कम 15000/- रुपये मागणी केली व फिर्यादी यांचे वर संशय आल्याने आलोसे यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही .

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड शहर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव व पत्ता | :- | श्री. युसूफ खान गुलाब खान, वय 45 वर्षे, पद-तलाठी, सजा- पिंप्री, तालुका सिल्लोड जिल्हा औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | 15000/- रुपये. |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक अधिकारी | :-<br>:- | दिपाली निकम, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद<br>राहुल फुला, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे वडिलांचे नावावर असलेली शेती तक्रारदार व त्यांचा मोठा भाऊ यांच्या नावावर करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे वडिलांचे नावावर असलेली शेती तक्रारदार व त्यांचा मोठया भावाच्या नावावर करुन देण्यासाठी आ.लो.से. श्री. युसूफ खान यांनी तक्रारदार यांना 15000/-रु. लाचेची मागणी करीत असल्याने तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>फिर्यादी यांचे तक्रारीवरुन दि.13/06/2023 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. **युसूफ शेख** यांनी फिर्यादी यांना रुपये 15000/- मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दि. 31/07/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. युसूफ शेख यांना तक्रारदारची शंका आल्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यांचे विरुध्द पो.स्टे. सिल्लोड शहर औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक-दिपाली निकम, सहाय्यक अधिकारी पो.नि. राहुल फुला यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार राजेंद्र सिनकर, सुनिल पाटील, विलास चव्हाण, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.